ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

# Maratha Vidya Prasarak Samaj's

# Arts, Science and Commerece College, Ozar (MIG)

## Course Outcomes

**Name of the department:** MARATHI

| Class | Name of the Course: Semester: (Paper): | Name of the Teacher | Outcomes |
|---|---|---|---|
| एफ वाय बी ए (१०२७) | जी-१ आधुनिक मराठी साहित्य | प्रा. श्रीमती चव्हाण के.व्ही.<br>प्रा. पाटील एन. बी. | 1. व्यक्तिमत्व विकासासाठी भाषेची मदत मिळते.<br>2. श्रवण, वाचन, लेखन, संभाषण, भाषण ही भाषिक कौशल्ये आत्मसात करता येतात.<br>3. सूत्रसंचालन, प्रास्ताविक, परिचय, स्वागत, सत्कार, मनोगत, आभार यासारखी कार्यक्रम संयोजन कौशल्ये आत्मसात करता येतात.<br>4. पारिभाषिक संज्ञा अभ्यासता येतात.<br>5. शुद्धलेखन प्रक्रिया समजावून घेता येते.<br>6. कथा वाड्मय या साहित्य प्रकाराचा परिचय आणि अभ्यास करता येतो.<br>7. विनोदी कथा कशा समजून घ्यावा आणि त्यांचा आस्वाद कसा घ्यावा हे कळते.<br>8. मराठी कवितांचा आस्वाद कसा घ्यावा ही आस्वाद प्रक्रिया समजून घेता येते.<br>9. मराठी कवितेतील आईचे |

Scanned by CamScanner

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

| | | | |
|---|---|---|---|
| | | | भावविश्व 'मातृपंचक' या काव्यसंग्रहातून अभ्यासता येते. |
| एस वाय बी ए (२०२७) | जी-२ आधुनिक मराठी साहित्य आणि उपयोजित मराठी | प्रा. श्रीमती चव्हाण के. व्ही. | 1. व्यावहारिक कामकाजासाठी उपयुक्त लेखन अभ्यासणे. उदा. अर्जलेखन, पत्रलेखन इ.<br>2. शुद्धलेखनाच्या नियमातून शुद्धलेखन प्रक्रिया समजावून घेता येते.<br>3. पारिभाषिक संज्ञा अभ्यासता येतात.<br>4. चरित्र या साहित्य प्रकारचे स्वरुप आणि व्याप्ती समजून घेता येते.<br>5. चरित्र वाड्मय प्रकारच्या अभ्यासातून थोर व्यक्तीच्या जीवनाची वाटचाल समजून घेता येते.<br>6. आत्मचरित्र आणि चरित्र या दोन वाड्मय प्रकारातील साम्यभेद अभ्यासता येतात.<br>7. विविध क्षेत्रातील मान्यवराच्या कार्याचा परिचय करून घेऊन त्यांच्या आयुष्यातून प्रेरणा घेता येते.<br>8. सरांशलेखन कौशल्य व्यावहारिक व कार्यालयीन कामकाजात उपयुक्त ठरते. |
| एस वाय बी ए (२०२८) | एस-१ मराठी साहित्यातील विविध साहित्य प्रकार | प्रा. पाटील एन. बी. | 1. मराठी साहित्यातील विविध साहित्य प्रकारांच्या अभ्यासातून |

Scanned by CamScanner

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE ★ OZAR (MIG) 275219

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मराठी साहित्य प्रकारांची वाटचाल व इतिहास अभ्यासता येतो.<br>2. वेगवेगळ्या काळखंडातील कलाकृती वाचकांवर कोणता संस्कार घडवतात ते अभ्यासता येते.<br>3. साहित्य प्रकारांच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांची साहित्यिक अभिरुची विकसित होण्यास मदत होते.<br>4. नाटक या साहित्य प्रकारची वाटचाल व इतिहासाचा विद्यार्थ्यांना ज्ञात करुन देता येतो.<br>5. नटसम्राट या नाटकाचा अभ्यास केल्याने नाटक या प्रकारचे वेगळेपण अभ्यासता येते.<br>6. नाटकाची प्रयोगमूल्ये आणि वाड्मयीन मूल्ये यांच्यातील फरक विद्यार्थ्यांच्या लक्षात येतो.<br>7. नटसम्राट नाटकाचे चित्रपट या माध्यमात माध्यमांतर करताना |

Scanned by CamScanner

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कोणत्या कौशल्यांची आवश्यकता असते याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली.<br>8. नाटक या साहित्य प्रकारचे आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन करण्याची क्षमता विकसित होण्यास मदत झाली.<br>9. नटसम्राट या कलाकृतीचा सूक्ष्म पातळीवरील अभ्यास करण्याची क्षमता विकसित होत गेली.<br>10. रंगभूमीवर नाटकाचा प्रयोग करण्यासाठी कोणकोणत्या घटकांची आवश्यकता असते याची जाणीव विद्यार्थ्यांना नटसम्राट या नाटकाचा अभ्यास करताना झाली.<br>11. कादंबरी या साहित्य प्रकारात फकीरा या कादंबरीचा अभ्यास करुन कादंबरी या वाड्मय प्रकारचे वेगळपण अभ्यासता आले. |

Scanned by CamScanner

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

| | | | |
|---|---|---|---|
| एस वाय बी ए (२०२९) | एस-२ अर्वाचीन मराठी वाड्मयाचा इतिहास | प्रा. श्रीमती चव्हाण के. व्ही. | 1. मराठी वाड्मयाची पार्श्वभूमी समजली.<br>2. मराठी वाड्मयाच्या प्रेरणा प्रवृत्ती अभ्यासता आल्या.<br>3. कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, ललित निबंध या साहित्य प्रकारांचा वाड्मयीन इतिहास अभ्यासता आला.<br>4. त्या काळातील मराठी लेखनशैली अभ्यासता आली.<br>5. मराठी वाड्मयातून त्या काळातील समाज, संस्कृतीचा आढावा घेता आला.<br>6. पदव्युतर अभ्यासाची पूर्वतयारी करुन घेता आली. |
| टी वाय बी ए (३०२७) | जी-३ आधुनिक मराठी साहित्य आणि व्यावहारिक व उपयोजित मराठी | प्रा. पाटील एन. बी. | 1. ग्रंथपरीक्षण अभ्यासातून ग्रंथांचा चिकित्सक अभ्यास करता येतो.<br>2. वृत्तपत्र व मासिकांमध्ये ग्रंथ परीक्षण लिहिता येते.<br>3. निबंध वाड्मय प्रकारची ओळख करून घेता येते.<br>4. विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निबंध प्रकारावर प्रश्न येतात त्यांची तयारी करुन घेता येते.<br>5. निबंधातील भाषिक सौन्दर्य अभ्यासता येते.<br>6. निबंध प्रकारची वाटचाल व इतिहास माहिती करुन घेता येतो.<br>7. निबंध वाड्मय प्रकारामुळे विद्यार्थ्यांमधील कल्पकतेला वाव मिळतो.<br>8. प्रवासवर्णन या साहित्य प्रकाराच्या अभ्यासामुळे विविध |

Scanned by CamScanner

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

| | | | |
|---|---|---|---|
| | | | प्रदेशातील साहित्य संस्कृतीची ओळख होते.<br>9. प्रवास वर्णन साहित्य प्रकारामुळे विद्यार्थ्यांची दृष्टी प्रगल्भ होते.<br>10. प्रवास वर्णनातील विविध माहितीमुळे विध्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानात भर पडते. |
| टी वाय बी ए (३०२८) | एस-३ साहित्यविचार | प्रा. पाटील एन. बी. | 1. साहित्यविचार या अभ्यास पत्रिकेतून साहित्याचे स्वरूप समजावून घेता येते.<br>2. साहित्याचे प्रयोजन समजावून घेता येतात.<br>3. साहित्याची निर्मीती प्रक्रिया समजावून घेतल्याने विद्यार्थी लेखकांना साहित्य लेखन कसे करावे हे समजते.<br>4. साहित्याची भाषा आणि व्यवहाराची भाषा यातील फरक लक्षात येतो.<br>5. साहित्य आस्वाद प्रक्रिया समजल्याने विद्यार्थी स्वतः साहित्यकृतीचा आस्वाद घेण्याचे कौशल्य आत्मसात करु शकतात.<br>6. साहित्यची अभिरुची प्रक्रिया समजावून घेतल्याने विद्यार्थ्यांची अभिरुची प्रगल्भ होण्यास मदत होते.<br>7. विद्यार्थ्यांचे वाङ्मयीन मूल्य आणि साहित्यिक मूल्य यांचा विकास होण्यास मदत होते.<br>8. साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध |

Scanned by CamScanner

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

| | | | |
|---|---|---|---|
| | | | समजल्याने विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव वृद्धिगत होते.<br>9. साहित्यविचाराच्या अभ्यासातून कलाकृती समजून घेण्यास व तिचा आस्वाद घेण्यात मदत होते. |
| टी वाय बी ए (३०२९) | एस -४ भाषाविज्ञान | प्रा. श्रीमती चव्हाण के. व्ही. | 1. वर्णनात्मक व ऐतिहासिक भाषाविज्ञानाच्या अभ्यासातून मराठी भाषचे स्वरूप, कार्य, भाषेच्या अभ्यासाचे महत्व व भाषेच्या अभ्यासाच्या प्रमुख घटकांचा परिचय झाला.<br>2. भाषा म्हणजे काय आणि भाषेचे मानवी जीवनातील कार्य समजले.<br>3. मराठी भाषेची स्वन निर्मिती प्रक्रियेचा विद्यार्थ्यांना परिचय झाला.<br>4. मराठीची स्वन-स्वनिम आणि स्वनांतर प्रक्रिया समजावून घेतली.<br>5. वागिंद्रीयाचे कार्य व रचना विध्यार्थ्यांना समजली.<br>6. मराठीची रुपिम व्यवस्था समजावून घेतली.<br>7. वाक्याविण्यासाच्या अभ्यासामुळे विध्यार्थ्यांना लेखन कौशल्य विकसित करण्यास मदत झाली.<br>8. भाषाकुलाची संकल्पना अभ्यासल्याने मराठी भाषेची |

Scanned by CamScanner

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ऐतिहासिक माहिती प्राप्त झाली.<br>9. ऐतिहासिक भाषाविज्ञानामुळे मराठी भाषा अभिजात भाषा होऊ शकते का याच्या शकयता तपासता आल्या. |
| एफ वाय बी कॉम (१५२३) | मराठी | प्रा. पाटील एन. बी. | 1. वाणिज्य विषयाच्या विध्यार्थ्यांना मराठीच्या व्यावहारिक उपयोजनाची माहिती करुन घेता आली.<br>2. भाषा विषयाचे स्वरुप व गरज समजावून घेता आली.<br>3. कार्यालयीन कामकाजात मराठी भाषेचा उपयोग अर्जलेखन, टिप्पणी लेखन, इतिवृत्त, माहिती पत्रक, घोषणा पत्रक, निविदा लेखन या प्रकारामध्ये कसा करावयाचा याचे कौशल्य प्राप्त करता आले.<br>4. प्रसारमाध्यमांचे स्वरुप समजावून घेऊन जाहिरात या घटकाची माहिती मिळवता आली.<br>5. जाहिरात लेखन करताना कोणते घटक आवश्यक असतात याचा परिचय विध्यार्थ्यांना झाला.<br>6. पारिभाषिक संज्ञाचा अभ्यास करता आला.<br>7. प्रसारमाध्यमातील लेखन प्रकारांची ओळख करुन घेतली.<br>8. राजभाषा म्हणून मराठीचे स्थान समजावून घेता आले.<br>9. अर्थकारण आणि वाणिज्य विषय मराठी भाषेतून |

Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | | परीणामकारकरित्या मांडता यावा यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा विचार करता आला. |
| एस वाय बी एस सी (८३११२) | मराठी | प्रा. श्रीमती चव्हाण के. व्ही. | 1. वैज्ञानिक दृष्टीकोणाचा स्वीकार.<br>2. प्रसारमाध्यमामध्ये विज्ञानविषयक लेखन.<br>3. पारिभाषिक संज्ञा समजावून घेता आल्या.<br>4. भाषांतर कौशल्य विकसित करता आले.<br>5. सारांश लेखन कौशल्य आत्मसात करता आले.<br>6. मराठी भाषेतून वैज्ञानिक संकल्पना चांगल्या पध्दतीने समजावून घेता येऊ शकतात याची जाणीव झाली.<br>7. विज्ञान कथा अभ्यासातून वैज्ञानिक कल्पना विलास अनुभवता आला.<br>8. विज्ञानाच्या परिभाषा विज्ञान कथेतून चांगल्या प्रकारे समजावून घेता आल्या.<br>9. विज्ञान कथा अभ्यासामुळे विज्ञान साहित्याची रुची वाढण्यास मदत होत झाली.<br>10. वैज्ञानिक मूल्ये रुजविण्यात विज्ञान साहित्याची मदत होते. |

Chavan

**H. O. D.**

**Department of Marathi**

ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE OZAR (MIG) 275219

Scanned by CamScanner